नवी आशा नवी दिशा

सार्वमत

अहिल्यानगर | अंक २७५ | वर्ष ४९ वे | शनिवार, २६ ऑक्टोबर २०२४ | पाने १२+४ | किंमत ₹ ६

ओपिनियन आणि एक्झिट पोलला प्रतिबंध

मुंबई (प्रतिनिधी)– महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाल्याच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या दरम्यान निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे. राज्यात १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघांत २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने निवडणूक निकालांचे अंदाज १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी सात वाजेपासून ते २० नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत कोणत्याही प्रकारच्या एक्झिट पोलचे आयोजन करणे, कोणत्याही माध्यमांद्वारे प्रकाशन अथवा प्रसारण करण्यास प्रतिबंध लागू राहणार आहे. त्याचप्रमाणे मतदान संपण्याच्या आधी ४८ तासांच्या कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल) अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असेही निवडणूक आयोगाने अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे.

आणखी २० जणांची उमेदवारी

आ.आशुतोष काळे, आ.राम शिंदेंचा प्रमुखांमध्ये समावेश

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– विधानसभा निवडणुकीसाठी चालू आठवड्यातील चार दिवसांचा अवधी संपला आहे. या चार दिवसांत जिल्ह्यातील १२ मतदारसंघांतून १ हजार १३ इच्छुकांनी उमेदवारी अर्ज विकत नेले आहेत. यातील ५३ जणांचे ६९ दाखल झाले आहेत. यात शुक्रवारी २० जणांचे २७ अर्ज दाखल झाले आहेत. काल उमेदवारी दाखल करणाऱ्या प्रमुखांमध्ये कोपरगावमध्ये आ.आशुतोष काळे आणि कर्जत–जामखेडमधून आ.शिंदे या प्रमुख उमेदवारांचा समावेश आहे. उर्वरित ठिकाणी लहान–मोठ्या पक्षासह अपक्षांचा समावेश आहे.

दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीचे पहिले चार दिवस संपले असून आता पुढील आठवड्यात सोमवार आणि मंगळवार हे दोनच (पान ६ वर)

चार दिवसांत ५६९ इच्छुकांनी नेले १ हजारांहून अधिक अर्ज

दाखल अर्जाची संख्या ६९

उमेदवारीत साखर सम्राटांचा वरचष्मा

नगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांवर वरचष्मा असणाऱ्या नेत्यांनाच सर्वपक्षीयांनी उमेदवारीमध्ये वरचे स्थान दिले आहे. प्रचार मुद्द्यांपेक्षा जात आणि आरक्षण आणि अभुतपूर्व फुटीच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या या निवडणुकीत पुन्हा एकदा या नेत्यांनी कंबर कसली आहे. राधाकृष्ण विखे पाटील, बाळासाहेब थोरात, आशुतोष काळे, शंकरराव गडाख, प्राजक्त तनपुरे, चंद्रशेखर घुले, मोनिका राजळे, रोहीत पवार, प्रताप ढाकणे हे नेते स्वतः निवडणूक रिंगणात उतरले आहेत. तर बबनराव पाचपुते, राजेंद्र नागवडे या दोघांच्याही पत्नी निवडणूक लढवत आहेत. राहुल जगताप यांनीही अपक्ष निवडणूक लढणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

उसाला ३७०० रुपयांचा एफआरपी द्यावा

परिषदेत ९ महत्त्वाचे ठराव

जयसिंगपूर– चालू गळीत हंगामासाठी सर्व साखर कारखान्यांनी प्रतिटन उसाला ३७०० रुपयांची एकरकमी एफआरपी द्यावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केली आहे. गतवर्षी तुटलेल्या उसाला दिवाळीपूर्वी तातडीने २०० रुपयांचा दुसरा हप्ता देण्यात यावा, असेही शेट्टी म्हणाले. काल स्वाभिमानी शेतकरी संघटनेची २३ वी ऊस परिषद जयसिंगपूरमध्ये पार पडली. या परिषदेत ९ महत्त्वाचे ठराव करण्यात आले आहेत. जाणून घेऊयात सविस्तर माहिती.

महत्त्वाचे ९ ठराव

१) यंदा पावसाचे प्रमाण जास्त

आहे. अनेक ठिकाणी पुरामुळे परतीच्या पावसामुळे भात, भाजीपाला, सोयाबीन, भुईमूग यासारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अजूनही पंचनामे देखील झालेले नाहीत. राज्य सरकारने तातडीने पिकांचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्यात यावी. (पान ६ वर)

मविआच्या फॉर्म्युल्याबाबत अजूनही सस्पेन्स कायम

आज पुन्हा उद्धव ठाकरे आणि बाळासाहेब थोरात चर्चा करणार

मुंबई–महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत अद्यापही सस्पेन्स कायम आहे. आज पुन्हा महाविकास आघाडीतील चर्चा होणार असून त्यानंतर अंतिम जागावाटप जाहीर होणार आहे. बाळासाहेब थोरात उद्धव ठाकरे यांच्याशी आज चर्चा करतील, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. दिल्लीत काल

काँग्रेसची हायकमांड सोबत बैठक पार पडली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिशदेत ते बोलत होते.

विदर्भातील काही जागा मित्रपक्षांसाठी सोडल्यामुळे राहुल गांधी महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेत्यांवर नाराज आहेतका? असाप्रश्नपत्रकारांनी नाना पटोले यांनी विचारला असता, नाना पटोले म्हणाले, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, (पान ६ वर)

संगमनेरात अखेर वादाचा भडका!

आक्षेपार्ह टिप्पणीमुळे थोरात समर्थक आक्रमक : गाड्या फोडल्या, जाळपोळ, रास्तारोको

संगमनेर (शहर प्रतिनिधी)– विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने विखे–थोरात गटातील संघर्षाचा अखेर भडका उडाला. धांदरफळ येथील विखेंच्या सभेतून महिलांचा अवमान झाल्याचा आरोप करत थोरात समर्थक कार्यकर्ते आक्रमक झाले असून तालुक्यात तीव्र पडसाद उमटले आहेत. काही गाड्यांची चिखली परिसरात तोडफोड करण्यात आली असून एका गाडीची जाळपोळ झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. दरम्यान, संतप्त महिलांनी धांदरफळ येथील सभास्थळी ठिय्या देत घोषणाबाजी केली. तालुका पोलीस स्थानकात कार्यकर्त्यांच्या जमावाने तणाव होता. दरम्यान, जिल्हा पोलीस अधीक्षक मध्यरात्रीच्या सुमारास संगमनेरच्या दिशेने निघाल्याचे वृत्त होते.

शुक्रवारी सायंकाळी (पान ६ वर)

शिष्यवृत्तीच्या सराव परीक्षेवरून वादाची चिन्हे

■ परीक्षा शाळा स्तरावर घ्या ■ शिक्षक संघटनांची मागणी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– शिष्यवृत्ती परीक्षा केंद्रस्तरावर न घेता आपापल्या शाळेतच घ्यावी. शाळेतून केंद्रापर्यंत विद्यार्थ्यांची वाहतूक खासगी वाहनाने करणे जबाबदारीचे काम आहे. त्यामुळे शाळास्तरावर ही परीक्षा घ्यावी, अशी मागणी सर्व शिक्षक संघटनांच्या समन्वय समितीच्यावतीने जिल्हा परिषद सीईओंकडे करण्यात आली आहे. तसे न झाल्यास शिक्षक संघटनांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी घेवून न जाण्याचा निर्णय घेतला असल्याचे सुत्रांनी सांगितले. यामुळे ऐन निवडणुकीत जिल्हा परिषदेत वादाची चिन्हे निर्माण झाली आहेत.

दरम्यान, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची तयारी व्हावी, यासाठी शिक्षण विभाग पाच सराव परीक्षा घेणार आहे. त्यातील पहिली सराव परीक्षा जिल्ह्यातील १६५ केंद्रांवर सोमवारी (दि.२८) होणार असून १३ हजार विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. यात पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) फेब्रुवारी २०२५ मध्ये होणार आहे. या परीक्षांची तयारी व्हावी, यासाठी ५ सराव परीक्षांचे नियोजन जिल्हा परिषदेच्या सेस निधीतून केले आहे. या परीक्षांमधून विद्यार्थ्यांची परीक्षेबद्दलची भीती दूर होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील यांनी याबाबतची पूर्वतयारी केली आहे. ऑक्टोबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत दरमहा एक याप्रमाणे (पान ६ वर)

साईमूर्तीची विटंबना शिर्डीत गुन्हा दाखल

शिर्डी (प्रतिनिधी)– सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओत साईबाबांच्या मूर्तीची विटंबना केल्याचे समोर आले असून हे दृष्य पाहून साई संस्थानची सबुरी संपुष्टात आली आहे. याप्रकरणी संस्थानचे संरक्षण प्रमुख रोहिदास माळी यांनी साई मूर्तीची विटंबना करणाऱ्या कमलेश पटेल नावाच्या अज्ञात इसमाविरूध्द शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला असून त्यात एक व्यक्ती श्रीसाईबाबांच्या मूर्तीला लाथ मारत आहे. हा व्हिडिओ गुजरातमध्ये शूट केला असून, या व्यक्तीने श्रीसाई बाबांची मूर्ती गाडीतून काढून रस्त्यावर फेकली आहे. या व्हिडिओमुळे धार्मिक भावना दुखावल्या असून, समाजात तणाव निर्माण होण्याची

शक्यता आहे.

या प्रकरणी साईबाबा संस्थानने कमलेश पटेल या व्यक्तीच्या विरोधात शिर्डी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले की, सदर व्यक्तीच्या फेसबुक अकाउंट वरील व्हिडीओमुळे भाविकांच्या भावना दुखावल्या आहेत. या व्हिडीओत एक मराठी कुटुंब चारचाकी मालवाहु गाडीचा रथ बनवून त्यावर (क्रमांक एमएच ४५ एएफ ६९५९) (पान ६ वर)

एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारासंदर्भात ३५० कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य

मुंबई– महाराष्ट्रातील एसटी कर्मचाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. आर्थिक संकटाच्या परिस्थितीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी महामंडळ) मोठा निर्णय घेतला आहे. एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या सणात काहीसा दिलासा देण्यासाठी सरकारने ३५० कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे. यामुळे कर्मचारी वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सप्टेंबर २०२४ च्या सवलतीच्या मूल्याच्या रकमेसाठी सरकारकडे विनंती केली होती. यावेळी महामंडळाच्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने शासनाने या विनंतीला मंजुरी दिली आहे. राज्य शासनाने एसटी महामंडळासाठी ३५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिवाळीपूर्वी ही रक्कम वीतरित करण्याचे नियोजन केले आहे.या निधीमुळे एसटीच्या कर्मचाऱ्यांना वेतन आणि इतर सुविधांसाठी मदत मिळणार आहे.

महाराष्ट्र राज्याच्या परिवहन आयुक्त यांना निधी वितरणासाठी प्राधिकृत करण्यात आले आहेत. त्यांच्या कार्यालयातील लेखाधिकारी एसटी (पान ६ वर)